# जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर
## खनिकर्म शाखा
स्वराज भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर
Email id- kolhapur.dmo@gmail.com

क्र.कार्या/६अ/आरआर/ १७०९ /२०१५ दिनांक :- २०/८/२०१५

प्रति,
श्री. भैरवनाथ अर्थमुव्हर्स अॅन्ड कंपनी धुंगुर
ता. शाहुवाडी, जि.कोल्हापुर

विषय :- लॅटेराईट या गौणखनिज खनिजाचा खाणपट्टा मंजुरीबाबत.

संदर्भ :- १. आपला दिनांक २१/३/२०१५ रोजीचा अर्ज व दिनांक १७/७/२०१५ रोजीचा फेर अर्ज.
२. उपवनसंरक्षक, वन विभाग, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/१९०/२०१४.१५ दिनांक १६/४/२०१५
३. संचालक, भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपुर यांचेकडील पत्र क्र एमएलआर/१८७७/ २०१२/१९६० दि. ६/७/२०१५
४. या कार्यालयाकडील पत्र क्र.कार्या/६अ/आरआर/७०५/२०१५ दिनांक २०/८/२०१५

आपण मौजे धुंगुर ता.शाहुवाडी येथील वन जमीन ग.नं. ६८५ मधील एकुण क्षेत्र हे ३०८.४७ आर या क्षेत्रापैकी हे. २५.०० आर क्षेत्र, मौजे परळी ता.शाहुवाडी येथील जमीन ग.नं. २२३ मधील एकुण क्षेत्र हे. २६२.४२ आर या क्षेत्रापैकी हे २०.०० आर क्षेत्र, मौजे परखंदळे ता. शाहुवाडी येथील वन जमीन ग.नं ५७२ ते ५७५ मधील एकुण क्षेत्र हे. ११९.७८ आर या क्षेत्रापैकी हे. २५.०० आर व मौजे आंबर्डे ता.शाहुवाडी येथील वन जमीन ग.नं. ९२१ मधील एकुण क्षेत्र हे. ८९.६१ आर या क्षेत्रापैकी हे. २०.०० आर असे एकुण हे. ९०.०० आर क्षेत्र लॅटेराईट या गौण खनिजाचे खाणपट्टा मंजुरीबाबत मागणी अर्ज संदर्भ क्र. १ अन्वये सादर केला आहे.

अर्जित क्षेत्र हे वन विभागाचे असल्याने वन (संवर्धन) अधिनियमन १९८० अंतर्गत वनक्षेत्राचा वापर वनेत्तर कामासाठी करणेचा झाल्यास त्याकरिता केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनाप्रमाणे प्रस्ताव सादर करुन केंद्रशासनाची पुर्व मंजुरी प्राप्त झाल्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे सदर अर्जाची छाननी केली असता खाणपट्टा मंजूर करणेकरीता खालील बाबीची /कागदपत्राची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. या कार्यालयाकडील संदर्भ क्र. ४ च्या पत्राचे अवलोकन करावे. त्यानुसार अर्जित क्षेत्र हे वन विभागाकडील असल्याने वन विभागामार्फत जागा निश्चिती व वन विभागाकडील प्रचलित नियमानुसार केंद्र शासनाकडील आवश्यक पुर्वानुमती घेणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकसन व विनियमन) नियम २०१३ च्या कलम ११ (५) (घ) नुसार
(अ) अर्जित क्षेत्राकरीता मान्य केलेला खाणकाम आराखडा आणि क्रमवधी खाण समाप्ती योजना आवश्यक आहे.
(ब) कलम ११ (५) (च) पर्यावरणविषयक अनुमती आवश्यक आहे.

तेव्हा आपणास सुचित करणेत येते की उपरोक्त नमुद केलेल्या १ व २ बाबीची पुर्तता करावी त्यानंतरच अंतिम खाणपट्टा मंजुर करणेची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर
करीता

मा. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या
मान्यतेने